# स्वातंत्र्य सैनिक श्री.रघुनाथ रामचंद्र माने गुरूजी व्यक्ति आणि कार्य.

**प्रा हमीद उमरअली काझी. इतिहास विभाग प्रमुख.कला आणि वाणिज्य महाविद्यालय. कळंब-वालचंदनगर,ता.इंदापूर,जि.पुणे.**

---

**सारांश :-** श्री.रघुनाथ रामचंद्र माने गुरूजी हे अकलुज परिसरात अण्णा आणि गुरूजी या नांवाने परिचीत आहेत.त्यांना ओळखत नाही अशी एकही व्यक्ति या परिसरात सापडणार नाही. गुरूवार दि.१५ मार्च १९१७ रोजी त्यांचा नातेपुते ता.माळशिरस,जि.सोलापूर येथे जन्म झाला.आज त्यांचे वय ९७ वर्षाचे आहे पण त्यांचा उत्साह तरूणांना लाजवेल असा आहे.हाताने शिवलेला भगवा शर्ट,पांढरे शुभ्र धोतर,डोक्याचे व दाढीचे वाढलेले केस,सडपातळ पण मजबुत शरीरयष्टी,डोळ्यात तेज,चेहऱ्यावर उत्साह आणि समाधान,सामाजिक कार्याची सतत चाललेली धडपड ही त्यांची काही प्रमुख गुणवैशिष्ठ्ये सांगता येतील.१९३६ मध्ये प्रसिध्द स्वा.सै.व माजी खासदार कै. तुळशिदास जाधव यांच्या भाषणाने प्रभावित होऊन माने गुरूजींनी कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला.तो काळ स्वातंत्र्य संग्रामाचा होता.माने गुरुजींनी परिसरातील खेड्यातुन सायकलवरुन खादीची विक्री करुन खादीचा,स्वदेशी मालाचा व कॉंग्रेसचा प्रसार केला.लोकांच्या मनात देशभक्तिची भावना जागृत केली.राष्ट्रसेवादलाच्या शाखा ठिकठिकाणी स्थापन केल्या.१९४२ च्या आंदोलनात गुरुजींनी हिरीरीने भाग घेतला.दि.३ सप्टेंबर १९४२ रोजी माळशिरस तालुक्यातील मोरोची,धर्मपूरी.शिंदेवाडी,डोंबाळवाडी,कुरबावी,दहीगांव या गावातुन तिरंगी झेंड्यासह फेरी काढून, बुलेटिन चिटकवुन,जाहीर सभा घेवून,भाषणे करून ब्रिटीश सरकारविरूध्द वातावरण तयार केले.दहिगावच्या सभेत भाषण करताना पोलिसांनी त्यांना अटक केली.भारत संरक्षण कायद्याखाली त्यांना ९ महिने सक्तमजुरी व १०० रू.दंड,दंड न भरल्यास २ महिने सक्तमजुरी अशी शिक्षा झाली.ही शिक्षा गुरुजींनी सोलापूर,विजापूर,विसापूर जेल मध्ये भोगली.अनेक मोठमोठ्या व्यक्तिंना जवळुन पहाण्याची,त्यांना ऐकण्याची व त्यांच्या सहवासात रहाण्याची तसेच भारतातील सर्व नद्यामध्ये स्नान करण्याची व सर्व पवित्र धर्मस्थळांना भेटी देण्याची संधी गुरूजींना मिळाली.अशा या थोर देशभक्त,स्वातंत्र्य सैनिकाचे कार्य शब्दबध्द करण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

**श्री.रघुनाथ माने गुरुजी यांचे अल्पचरित्र :-** स्वा.सै.श्री.रघुनाथ रामचंद्र माने हे अकलुज परिसरात गुरूजी या नांवाने ओळखले जातात.त्यांचा जन्म गुढीपाडव्याच्या दिवशी गुरुवार दि.१५ मार्च १९१७ रोजी नातेपुते येथे झाला.त्यांच्या आईचे नांव वाळूबाई व वडिलांचे नांव रामचंद्र हरीबा माने असे होते.त्यांचे आजोबा हरीबा मानसिंगराव माने,मुळचे म्हसवडचे.उदरनिर्वासाठी त्यांनी म्हसवड सोडले.घरच्या गरिबीमुळे माने गुरूजीचे बालपण व सातवीपर्यंतचे प्रा.शिक्षण नातेपूते येथे त्यांचे मामा शंकरराव जाधव यांच्याकडे झाले. त्यावेळी संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात सोलापूर येथेच सातवीचे केंद्र होते सन १९३३ साली ५५ टक्के गुण मिळवुन माने गुरुजी सातवीला पहिल्याच प्रयत्नात उत्तिर्ण झाले. इच्छा असुनही परिस्थीतीमुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही.ज्या मामाने त्यांना सातवीपर्यंत शिकवले त्या मामांवर आणखी बोझा टाकणे त्यांना योग्य वाटले नाही कारण त्यांचीही परिस्थीती बेताचीच होती.लोकल बोर्डाकडे शिक्षकपदासाठी त्यांनी अर्ज केला पण त्याचा उपयोग झाला नाही.मिळेल ते काम करण्याच्या उद्देशाने त्यांनी मुंबई गाठली.मुंबईच्या वास्तव्यात अत्यंत हलाखीत,आजारी पडुन त्यांच्या आईचा मृत्यू झाला. आईच्या अंत्यसंस्कारासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते.त्यावेळी ते रहात असलेल्या शिवडीच्या झोपडपट्टीतील लोकांनी त्यांना मदत केली. अशा हलाखीत रहाण्यापेक्षा आपल्या गावी जावे असा विचार करुन ते पून्हा नातेपुतेस आले.मामांच्या ओळखीने वालचंदनगर,नातेपुते या ठिकाणी किराणा दूकानात ते कामास राहिले.सन १९३८मध्ये गणपतराव जाधव (थोरले मामा) यांची ज्येष्ठ कन्या मथुरा यांच्याबरोबर शनिवार दि.२९ मे १९३८ रोजी गुरूजींची विवाह झाला.सध्या त्यांचा चार मुले,एक मुलगी (क्रांतीदेवी),चार सुना,सहा नातु,चार नाती असा परिवार आहे.वयाच्या ५५ व्या वर्षी गुरूजींनी डॉक्टरांचा विरोध असतानाही दि.०८ ऑक्टोबर १९७१ रोजी संतती नियमनाची शस्त्रक्रिया केली. १९३३ ते ३५ या दरम्यान त्यांनी हॉटेल, गोदाम, किराणा, कापड दूकानात रोजंदारीवर काम केले.१९३५ ते १९४२ या काळात माळशिरस तालुक्यातील आठ गावी को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे सेक्रेटरी,१९४४ ते १९४७ या काळात खरेदी-विक्री संघाच्या नातेपूते,अकलुज शाखेत व्यवस्थापक,.सन १९४६ पासून पुढे सुमारे ५-६ वर्षे गुरूजींनी लोकशक्ती,विशाल सह्याद्री व सोलापूर समाचार चे बातमीदार म्हणून काम केले.सत्य व निर्भीड बातमीदार म्हणून ते प्रसिध्द होते.१९४७ मध्ये विजय विद्यार्थी वसतिगृहाचे सुपरिटेंडेंट,१९४८ ते १९६९ या काळात शिक्षण प्रसारक मंडळ,अकलुज चे जनरल सेक्रेटरी,१९४५ ते १९५२ या काळात माळशिरस तालुका कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी,सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कार्यकारणी सदस्य,प्रांतिक कॉंग्रेस कमिटी सदस्य, १९८९ ते १९९५ या काळात विशेष कार्यकारी दंडाधिकारी अशी विविध पदे गुरूजींनी भूषवली.माळशिरस तालुका ज्येष्ठ नागरिक संघटनेचे ते संस्थापक सदस्य ,विद्यमान सदस्य आणि माळशिरस तालुका स्वातंत्र्य सैनिक समितीचे अध्यक्ष आहेत.प्रौढ साक्षरता वर्गात ते अशिक्षीत प्रौढांना शिकवत असत त्यामुळे ते प्रौढ विद्यार्थी त्यांना गुरूजी असे म्हणु लागले तेव्हापासुन ते गुरूजी या नावाने ओळखले जावू लागले. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांचा उल्लेख गुरूजी असाच करण्यात आला आहे.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील माने गुरूजींचा सहभाग :-**

**खादीचा व कॉंग्रेसचा प्रसार :-** माळखांबी सोसायटीचे चेअरमन भिमराव भांगे यांनी १९३७ मध्ये माळखांबी येथे शेतकरी परिषद आयोजित केली होती. या परिषदेच्या प्रचाराची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी त्यांनी गुरूजींवर टाकली होती. या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणुन सोलापूर लोकल बोर्डाचे व कॉंग्रेसचे अध्यक्ष तुळशिदास जाधव उपस्थित होते. त्यांच्या भाषणाचा प्रभाव गुरूजींवर पडला ते कॉंग्रेसचे क्रियाशिल सदस्य व पूर्ण खादीधारी बनले.पंढरपूर खादी भांडारातुन खादी विक्रीची एजन्सी घेवुन ते सायकलवरून, खेड्यापाड्यातुन खादीचा प्रसार व विक्री करू लागले.१९३७ मध्ये बार्शी येथे सोलापूर जिल्ह्यातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे शिबीर आयोजित करण्यात आले होते.या शिबीराला तुळशिदास जाधव,डॉ.अंत्रोळीकर,छन्नुसिंग चंदेले परदेशी,देवराव मोरे इ.प्रसिध्द नेते उपस्थित होते.या सर्वांच्या संपर्कात आल्याने गुरूजींची देशभक्ती अधिकच ज्वाज्वल्य झाली.

**सेवादलाची स्थापना :-** १९४० मध्ये पुण्यात भरलेल्या आठ दिवसांच्या राष्ट्रसेवादलाच्या शिबीरास गुरूजी उपस्थित होते.या शिबीरात डॉ.हर्डीकर,एस.एम.जोशी,निळुभाऊ लिमये इ.नी मार्गदर्शन केले.शिबीराहून परत आल्यानंतर गुरूजींनी नातेपुते येथे सेवादलाची शाखा सुरू केली.सुरवातीला १५-२० जण असणाऱ्या या शाखेत पुढे २५०-३०० तरूण सहभागी झाले.पहाटे प्रभात फेरी,कवायत,झेंडा वंदन अशी दिनचर्या जवळजवळ तीन वर्षे सुरू होती.प्रभात फेरीत गर्जा जयजयकार,खरा तो एकची धर्म,उठू दे,देश पेटू दे अशी देशभक्तीपर गीते व नही रखना,नही रखना.अंग्रेज सरकार नही रखना अशा घोषणा दिल्या जात. लोंकामध्ये देशप्रेम जागृत व्हावे,ब्रिटीश राजवटी बध्दल चिड निर्माण व्हावी हा त्यामागचा हेतु होता.नातेपुते सोसायटीमध्येच त्यांनी एक वाचनालय सुरू केले.त्यात राष्ट्रीय नेत्यांचे साहित्य व चरित्रे ठेवण्यात आली होती.या वाचनालयातील पुस्तके लोकांना वाचण्यासाठी मोफत दिली जात.आसपासच्या खेड्यातुन सेवादलाच्या शाखा काढण्यात आल्या.साने गुरूजी पंढरपूरला जात असताना शनिवार दि.२ मार्च १९४६ रोजी त्यांची जाहिर सभा गुरूजींनी अकलूज येथे आयोजित केली.

**१९४२ च्या आंदोलनातील सहभाग :-** म.गांधीजींनी सन १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली.पाहिले सत्याग्रही म्हणुन त्यांनी विनोबा भावे यांची निवड केली.गुरुजींनी या सत्याग्रहासाठी आपले नाव दिले होते.पण माळशिरस तालुक्यातुन फक्त अकलुज चे मारूतराव कुदळे व जिवराजभाई दोशी (भांबुर्डिकर) यांचीच निवड झाली.सत्याग्रहाबध्दल या दोघांना प्रत्येकी चार महिन्याची शिक्षा झाली.पुढे म.गांधीजींनी ही चळवळ स्थगीत केल्याने गुरुजींचे सत्याग्रह करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले.१९४२ मध्ये भारतात चलेजाव चळवळ सुरू झाली.ब्रिटीश सरकारने सामर्थ्याच्या जोरावर ही चळवळ दडपून टाकण्याचे ठरवले.नेत्यांची धरपकड सुरू झाली.अकलुजला सभा घेतल्याबध्दल मारूतराव कुदळे,मुरलीधर निकुंभ,लक्ष्मणराव निकुंभ, रायचंद व्होरा,ज्ञानेश्वर कुरूडकर,जगन्नाथ अडाणे,डॉ.कानिटकर यांना अटक करून सोलापूर जेल मध्ये ठेवण्यात आले. दररोज धरपकडीच्या, जाळपोळीच्या बातम्या ऐकु येत होत्या. गुरूजींचे मन देशभक्तिने भरून येत होते. आपणही काहीतरी करावे असे त्यांना वाटत होते.त्यादृष्टीने त्यांनी तयारी सुरू केली.याच दरम्यान गुरूजींना पहिली मुलगी झाली.मुलीचे नांव क्रांती ठेवले.गुरूवार दि.३ सप्टेंबर १९४२ रोजी गुरूजींनी सत्याग्रह करण्याचे ठरवले.कारण २ सप्टेंबरला गोकुळअष्टमी होती.त्यामुळे आपल्या सभेला मोठ्या संख्येने लोक भेटतील असा गुरूजींचा अंदाज होता.गुरूजीं दहिगांवला जावून सत्याग्रह करणार हे पोलिसांनी समजले.त्यादिवशी माळशिरसचे मामलेदार,फौजदार नातेपूते येथे मुक्कामास आले. दोन पोलिस रात्री बारा पर्यंत गुरूजींबरोबर होते.गुरूजीं दहिगावला जात असताना नातेपूते येथेच त्यांना पकडण्याचा त्यांचा विचार होता.गुरुजींना झोप येत नव्हती म.गाधीजींचा संदेश जनतेपर्यंत पोचवणे आवश्यक होते.गुरूजींनी रात्री दिड वाजता घर सोडले. बरोबर त्यांनी तिरंगा झेंडा, झेंडा अडकविण्यासाठी काठी, पत्रके (बुलेटिन), पत्रके चिटकवण्यासाठी खळ इ.सर्व साहित्य एका पिशवीत भरून गुरूजी पहाटे चार पर्यंत नातेपूतेच्या खरेदी-विक्री संघाच्या कार्यालयात थांबले.पहाटे चार वाजता गुरूजी तेथून निघाले व मोरोची ला आले.तोपर्यंत उजाडले होते.काठीला तिरंगा झेंडा लावून गावातून त्यांनी फेरी काढली.मोक्याच्या

ठिकाणी ब्रिटीशसरकारविरोधातील पत्रके चिटकवली.ज्या मंदिरात कृष्णजन्माष्टमीचा सोहळा झाला त्या मंदिराबाहेर उभे राहुन ऐका हो ऐका आणि दुसऱ्यांनाही सांगा अशा आरोळ्या दिल्या.गुरूजींच्या आरोळ्या ऐकुन लोक जमा झाले.जमलेल्या लोंकांसमोर गुरूजींनी या महायुध्दाचा भारताशी काहीही संबंध नाही त्यामुळे धान्याच्या,पैशाच्या किंवा कोणत्याच रुपात ब्रिटीश सरकारला मदत देवू नका.भारतालास्वतंत्र करण्यासाठी जिवाची पर्वा न करता प्रयत्न करा.करा अथवा मरा हा म.गांधीजींचा संदेश देण्यासाठी मी तुमच्यापर्यंत आलो आहे.अशा आशयाचे भाषण केले.तेथून धर्मपूरी, शिंदेवाडी, डोंबाळवाडी, कुरबावी असा प्रवास करीत मोक्याच्या ठिकाणी पत्रके चिटकवत, फेरी काढून, भाषणे करीत गुरूजी दूपारी दोन च्या सुमारास दहिगांव ला पोहचले.इकडे सकाळी पोलीस गुरूजींच्या घरी आल्यावर गुरूजी घरी नसल्याचे त्यांना समजले.तेव्हा पोलिसांची धावपळ सुरू झाली.पोलिस माग काढत मोरोचीला पोहचले.तेथे गुरूजींनी लावलेली पत्रके त्यांनी काढली आणि पोलिसपाटलांचा जवाब घेवून ते धर्मपूरी ला गेले तोपर्यंत गुरूजी पुढे गेले होते.अशा रितीने गुरूजी पुढे व पोलिस मागे असा पाठशिवणीचा खेळ सुरू झाला.शेवटी पोलिसांनी गुरूजींना दहिगांवला गाठले. गुरूजी मंदिराच्या कट्टयावर उभे राहुन,झेंडा फडकावित मोठ्या आवाजात बोलत होते.इंग्रजाना महायुध्दासाठी कोणतीही मदत करू नका,सैन्यात भरती होऊ नका,इंग्रजाना देशातुन घालवण्यासाठी हीच योग्य वेळ आहे.करा अथवा मरा हा म.गांधीजींचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी मी येथे आलो आहे.असे गुरूजींनी आपल्या कणखर,धारदार,धीरगंभीर पण मोठ्या आवाजात सांगितले.आजचा गुरूजींचा खणखणित आवाज ऐकल्यावर त्यावेळी त्यांचा आवाज कसा असेल याची कल्पना येते.मामलेदाराच्या आदेशाने फौजदारांनी गुरूजींना अटक केली.त्यांच्या हातातील झेंडा हिसकावून घेतला.काठी,झेंडा,खळीचा डबा,२१ पत्रके इ.साहित्य जप्त केले.गुरूजींना घेवून पोलिस दहिगांववरून नातेपूतेमार्गे माळशिरसला आले.गुरूजींना तुरूंगात टाकण्यात आले.सत्याग्रह केल्याचे समाधान लाभल्याने गुरूजींना त्या रात्री शांत झोप लागली.दूसऱ्या दिवशी गुरूजींना पंढरपूरला नेवून प्रांतापुढे उभे करण्यात आले.भारत संरक्षण कायदा कलम ३८ (५),३८ (१),३४ (६) डी आणि के अन्वये गुरूजींना ९ महिने सक्तमजूरी व १०० रू.दंड,दंड न भरल्यास दोन महिने सक्तमजूरी अशी शिक्षा सुनावण्यात आली.या शिक्षेविरूध्द गुरूजींनी अपील केले नाही तसेच माफी मागुन स्वतःची सुटकाही करून घेतली नाही उलट त्यांनी आपला गुन्हा कबुल केला.आठवड्यानंतर गुरूजींना सोलापूर जेल मध्ये नेण्यात आले.त्यानंतर विजापूर व तेथून अहमदनगर जिल्ह्यातील विसापूर जेल मध्ये ठेवण्यात आले.यावेळी गुरूजींचे वय २५ वर्षाचे होते व जेलमधील त्यांचा क्रमांक ८४१ होता.जेलमध्ये गुरूजींनी ज्ञानेश्वरी,तुकाराम महाराजांची गाथा,दासबोध तसेच राष्ट्रीय नेत्यांच्या चरित्रांचे वाचन केले.दर शनिवारी गुरूजी मौन पाळत.आत्मबळ व मनोधैर्य वाढवणे तसेच मनाचा शरीरावर ताबा ठेवणे हा त्यामागचा उद्देश होता.विसापूर जेलमध्ये विविध भागातील अनेक सत्याग्रहींशी गुरूजींचा परिचय झाला.अनेकांकडे असलेले अनेक सदगुण मला त्यांच्यापासून घेता आले असे गुरूजी म्हणतात.इकडे १०० रूपयांचा दंड वसुल करण्यासाठी सरकारने गुरूजींच्या नातेपुते येथील घरावर जप्ती आणली व घरातील सर्व साहित्याचा लिलाव केला.त्यामध्ये स्टोव्ह,सायकल,भांडी,धान्य इ.चा समावेश होता.बुधवार दि.३० सप्टेंबर १९४२ रोजी गुरूजींना विसापूर जेलमध्ये आणण्यात आले व शनिवार दि.१५ मे १९४३ रोजी त्यांची जेलमधुन सुटका झाली.जेलमधुन सुटल्यानंतर गुरूजींनी काँग्रेसचे कार्य अधिक जोमाने सुरू केले.

**<u>भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय :-</u>**जेलमधुन सुटल्यानंतर गुरूजी नातेपुते येथील आपल्या घरी आले.काही दिवसांनी एक अनोळखी व्यक्ति गुरूजींना भेटण्यास त्यांच्या घरी आली.आपण जेलमधुन सुटला असल्याने आपणास भेटायला आल्याचे त्यांनी गुरूजींना सांगितले.पुढे एका महिन्यात सुमारे ३-४ वेळा ती व्यक्ति गुरूजींना भेटण्यास त्यांच्या घरी आली.एकदा ती व्यक्ति गुरूजींच्या घरी मुक्कामाला आली असताना नवाकाळ मधील एका बातमीकडे त्यांनी गुरूजींचे लक्ष वेधले.त्यात १०-१२ जणांची नांवे होती.त्यापैकी एक नांव नाथाजी बाबुराव लाड होते.त्यांना पकडुन देणाऱ्यास सरकारने ५००० रुपयांचे बक्षिस ठेवले होते.या व्यक्तिला तुम्ही पकडुन दिल्यास तुम्हाला ५००० रुपये मिळतील तसेच सरकारकडून तुमचा सत्कार होईल असे त्या व्यक्तिने गुरूजींना सांगितले.माने गुरुजी प्रखर देशभक्त व गांधीवादी होते.दूसऱ्या देशभक्ताला पकडून देवून सरकारकडून बक्षिस मिळवणे हे त्यांच्या चौकटीत बसणारे नव्हते.तरीही ते मिश्किलपणे म्हणाले नाथाजी लाड कोण आहेत कोठे आहेत हे मला माहित नाही. मी त्यांना ओळखतही नाही तेव्हा त्या व्यक्तिने आपली ओळख सांगितली.ते स्वतःच नाथाजी लाड होते.एवढी मोठी व्यक्ति आपल्या घरी येते या विचाराने गुरूजी धन्य झाले.तेव्हापासुन ते त्यांची जास्तच काळजी घेऊ लागले.नाथाजी बाबुराव लाड हे क्रातिसिंह नाना पाटील यांचे सहकारी व सेक्रेटरी होते.दि.८ डिसेंबर १९४२ रोजी पहाटे शेणोली रेल्वे स्टेशन जाळण्यात आले त्यामध्ये नाथाजी लाड यांचा प्रमुख सहभाग होता.दि.७ जुन १९४३ रोजी शेणोली जवळ खिंडीत ३५ क्रांतिकारकांच्या गटाने पे ट्रेन अडवली व पगाराने भरलेल्या पेट्या ताब्यात घेतल्या.त्यात नाथाजी लाड यांचा सहभाग होता. दि.३ ऑगष्ट १९४३ रोजी पणंब्रे ता.शिराळा येथे भूमिगत क्रातिकारंकाची बैठक झाली .नाथाजी लाड यांची डिक्टेटर म्हणून नियुक्ति करण्यात आली.प्रतिसरकारची तुफान सेना स्थापन करण्यात आली होती.कुंडलच्या व्यायामशाळेत त्याचे केंद्र होते.गणपत दाजी लाड,नाथाजी लाड हे केंद्र संचालक होते. पुढे नाथाजी,गुरूजींना औंध मध्ये घेवून गेले तेथे क्रातिकारकांच्या गुप्त बैठका होत.त्या बैठकीत पुढील कार्यक्रमाचे नियोजन केले जाई.नाथाजीनी तेथे सर्वांना गुरूजींची ओळख करून दिली.आपण गुरूजींकडे निर्धास्तपणे मुक्काम करीत असल्याचे त्यांनी तेथे आवर्जून सांगितले.

**<u>क्रांतिसिंह नाना पाटील व गुरूजी :-</u>** क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या भूमिगत कार्यकर्त्यांवरील बंदी सरकारने उठवल्यानंतर क्रांतिसिंह नाना पाटील यांनी अनेक ठिकाणी जाहीर सभा घेतल्या. त्यावेळी दि.५ मे ते १० मे १९४६ या काळात कराड,कोनेगांव,वाटेगांव, शिराळे, इस्लामपूर, वाळवा, तासगांव, विटा, वडूज,औंध,बुध,सातारा,कवठे या ठिकाणी तसेच सोमवार दि.२० मे १९४६ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नातेपूते, माळशिरस, अकलुज,वेळापूर व फळवणी येथे झालेल्या जाहिर सभेस व मिरवणूकात गुरूजी उपस्थित होते.क्रांतिसिंहाचे सहकारी व सेक्रेटरी नाथाजी लाड यांच्या समवेत गुरूजी रहात असल्याने क्रांतिसिंह नाना पाटील गुरूजींना व्यक्तिशः ओळखत होते. त्यानंतर गुरूजी,मुरलीधर निकुंभ यांच्यासह क्रांतिसिंह नाना पाटलांच्या अमरावती,नागपूर दौऱ्यात सहभागी झाले.पुढे १९४७ मध्ये गुरूजी क्रांतिसिंह नाना पाटील व नाथाजी लाड यांच्या बरोबर बनारसला गेले.तेथे तनपूरे महाराज यांच्या चारधामयात्रेच्या सांगता समारभाला ते उपस्थित होते.

**<u>तालुका काँग्रेस कमेटीचे जनरल सेक्रेटरी पदावर निवड :-</u>**सन १९४५ मध्ये काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली अकलुज येथे माळशिरस तालुक्यातील कार्यकर्त्यांची सभा आयोजित करण्यात आली होती.या सभेत माळशिरस तालुका काँग्रेस कमेटीची पुनर्रचना करण्यात आली. मारूतराव कोंडिबा कुदळे यांची अध्यक्ष,रघुनाथ रामचंद्र माने यांची जनरल सेक्रेटरी, तर सर्जेराव सोनुजी देवकर यांची सह सचिव म्हणुन निवड करण्यात आली.या पदावर गुरूजी १९५२ पर्यंत होते.

**<u>सोलापूर जिल्हा लोकल बोर्डावर निवड :-</u>** १९४६ मध्ये सोलापूर जिल्हा लोकल बोर्डावर माळशिरस तालुक्यातून गुरूजींची बिनविरोध निवड झाली.१९५२ पर्यंत ते या पदावर होते.

**<u>काँग्रेस व सेवादल शाखांची स्थापना :-</u>** १९४५ मध्ये गुरूजींनी गिरझणी येथे माळशिरस तालुक्यातील कार्यकर्त्यांचे शिबीर व नंतर अकलूज येथे राष्ट्रसेवादल कार्यकर्त्यांचे शिबीर आयोजित केले.मुरलीधर निकुंभ,वेताळराव गायकवाड यांच्यासह गुरूजींनी १९४५ - ४७ या काळात सायकलवरून संपूर्ण माळशिरस तालुक्याचा दौरा करून खेडोपाडी काँग्रेस समित्या व सेवादलाच्या शाखा स्थापन केल्या.अनेक ठिकाणी वाचनालये,प्राथमिक शाळा,व्हॉलेंटरी शाळा,सुरू केल्या. सभा मिरवणूका,प्रवचने,राष्ट्रीय कीर्तन इ.व्दारे लोकांमध्ये सहकारी चळवळ,शिक्षणाचा प्रसार,दारूबंदी,अस्पृश्यता निवारण,स्वदेशी चळवळ,सुतकताई,खादीचा प्रसार,महिला मंडळाची स्थापना,परदेशी मालावर बहिष्कार इ.चा प्रसार केला.अनेक गांवात सुतकताईचे वर्ग सुरू केले.माळशिरस तालुका काँग्रेस कमेटीचे जनरल सेक्रटरी,सोलापूर जिल्हा काँग्रेस कार्यकारी समितीचे सदस्य,महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अधिकृत सदस्य म्हणून गुरूजींनी कार्य केले.त्यामुळे यशवंतराव चव्हाण,भाऊसाहेब हिरे,केशवराव जेधे,काकासाहेब गाडगीळ,शंकरराव देव, शंकरराव मोरे,तुळशिदास जाधव,मामासाहेब देवगिरीकर इ. मान्यवरांना जवळून पहाण्याची व त्यांच्या मार्गदर्शनाची संधी गुरूजींना मिळाली.

**<u>म.गांधीजींच्या प्रार्थना सभेला उपस्थिती :-</u>** १९४५ मध्ये म.गांधीजींचा मुक्काम पुण्यास हाता त्यावेळी त्यांनी ऑल इंडिया काँग्रेस वर्कींग कमेटीची तेथे मिटींग ठेवली होती. म.गांधीजींना समक्ष पहाण्याच्या उद्देशाने गुरूजी आपली पत्नी सौ.मथूरा,मुलगी क्रांती यांच्यासह पुण्यास गेले.वर्कींग कमेटीची मिटींग संपल्यानंतर बापू सायंकाळच्या सामुदायिक प्रार्थनेला निघून गेले.यावेळी त्यांच्या बरोबर प.नेहरू.मौलाना आझाद,सरदार पटेल,सरहद्द गांधी खान अब्दूल गफारखान इ. नेते होते.या सर्वांना पहाण्याचा व त्यांच्यासोबत म.गांधीजींच्या सामुदायिक प्रार्थनेला अगदी जवळ,पहिल्या रांगेत बसण्याची संधी केशवराव जेधे यांच्यामुळे गुरूजींना मिळाली.

**<u>काँग्रेसच्या नाशिक अधिवेशनास उपस्थिती :-</u>** सन १९५० च्या काँग्रेसच्या नाशिक अधिवेशनासाठी गुरूजी प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित

होते.यावेळी त्यांच्या बरोबर त्यांची पत्नी सौ.मथूरा,मुलगी क्रांती, वेताळराव गायकवाड,विझोरीचे बापूराव बोरकर इ.लोक होते.यावेळी अधिवेशनाचे अध्यक्ष पुरूषोत्तमदास टंडन,प.जवाहरलाल नेहरू,सरदार पटेल इ.व्यक्तिंना जवळून पहाण्याची व ऐकण्याची संधी गुरूजींना मिळाली.

**समाजकार्य :- १) प्लेग ग्रस्तांना मदत** :- सन १९४१ मध्ये नातेपूते येथे प्लेग ची साथ आली होती.त्यामुळे तेथील बहुतेक लोक आपापल्यासोयीनुसार वाड्यावस्त्यांवर रहाण्यास गेले होते.प्लेग मुळे गावात रोज १०-१२ लोकांचा मृत्यु होत असे.त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी त्यांचे नातलगही पुढे येत नसत.गुरूजींनी यावेळी आपल्या सेवादलाच्या कार्यकर्त्यांना (सैनिक) बरोबर घेऊन प्लेग ग्रस्तांना मदत केली.हे सर्व जण प्लेगची लागण झालेल्या व्यक्तिच्या घरी जावून प्लेगच्या गाठीवर बचनाग व कुचल्याचे बी उगाळून लेप लावीत.या उपायाने अनेक रोग्यांना आराम मिळाला.बऱ्याच दिवसांच्या उपायाने अनेक रोगी बरे झाले.तर अनेक दगावले.प्लेगने मरण पावलेल्या लोंकांजवळ त्यांच्या घरचे लोकही जात नसत.अशावेळी त्या मृत व्यक्तिला गुरूजी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने ताटीवरून स्मशानभूमित नेत व त्यांच्यावर विधीपूर्वक अंत्यसंस्कार करीत.

**२) साक्षरता वर्ग (प्रौढ शिक्षण ):-** गुरूजींवर म.गाधीजींचा जसा प्रभाव होता तसाच प्रभाव क्रांतिसिंह नाना पाटील यांचाही होता.क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या १४ कलमी योजनेमध्ये सार्वजनिक वाचनालय व साक्षरता वर्ग यांचा समावेश होता.जेलमधुन सुटल्यानंतर गुरूजींना नातेपूते येथील खरेदी विक्री संघात नोकरी मिळाली.पुढे त्यांची बदली अकलुज ला झाली. अकलुज, नवचारी,महाळूंग,माळखांबी,मळोली येथे संघाने धान्यदूकाने चालु केली होती.त्यावर देखरेख करण्याची जबाबदारी गुरूजींवर सोपवण्यात आली होती.या सर्व ठिकाणी गुरूजी सायकलवरून जात.त्यामुळे अनेक लोकांशी गुरूजींचा जिव्हाळ्याचा संबंध आला.गुरूजींचे काँग्रेस प्रचाराचे कार्य चालुच होते.जाहीर सभेत ते लोकांना अत्यल्प खर्चात विवाह करावेत,मुलांना भरपूर शिकवावे,स्वतःही शिकावे,शिक्षणासाठी वय आडवे येत नाही.भांडण तंटा करू नये झाल्यास आपापसात मिटवावा अशा प्रकारचे आवाहन करीत.लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण यापैकी गुरूजी नव्हते.पौढशिक्षणाची सुरूवात त्यांनी आपल्या घरापासुन करण्याचे ठरवले.त्यांच्या पत्नि सौ.मथुरादेवी अशिक्षीत होत्या.गुरूजींनी त्यांना शिकण्याचा आग्रह धरला.पण त्यांनी नकार दिला.माझा शिकुन काय उपयोग असा परंपरावादी विचार त्यांनी त्यावेळी केला असल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते.पण गुरूजी आपला हट्ट सोडण्यास तयार नव्हते.शिवाय जबरदस्ती करणाऱ्यांपैकीही ते नव्हते.आपल्या प्रयत्नाला यश येत नाही हे पाहिल्यावर गुरूजींनी म.गांधीजींच्या सत्याग्रहाच्या अस्त्राचा अवलंब करण्याचे ठरवले.तु जोपर्यंत शिकत नाही तोपर्यंत आपण अन्नत्याग करीत असल्याचे त्यांनी आपल्या पत्निस सांगितले.दोन दिवसानंतर गुरूजींच्या सत्याग्रहाला यश आले.तिसऱ्या दिवशी त्यांच्या पत्निने शिकण्याचे मान्य केले.सहा महिन्यात गुरूजींनी त्यांना १०० पर्यंत अंक,बाराखडी,मुळाक्षरे,सोपी जोडाक्षरे लिहण्या-वाचण्यास शिकवले.पुढे गुरूजींनी १९४८ मध्ये रात्रीचा प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केला. दिवसा कष्ट करणारे अनेक अशिक्षीत लोक शिक्षणासाठी रात्रीच्या प्रौढ साक्षरता वर्गात येऊ लागले.गुरूजींना ते गुरूजी म्हणून हाक मारू लागले.यावेळी गुरूजी विजय विद्यार्थी वसतीगृह अकलुजचे सुपरिटेंडेट होते.वसतीगृहाचे विद्यार्थीहि त्यांना गुरूजी असे संबोधु लागले अशा रितीने रघुनाथ रामचंद्र माने हे माने गुरूजी म्हणुन ओळखु लागले आजही ते याच नावाने ओळखले जातात.शिक्षक होण्याची त्यांची इच्छा होती.ती आता या अर्थाने पुर्ण झाली.

**३) अत्यल्प खर्चात गांधी लग्न आणि हूंडा प्रथेला विरोध :-** विवाहासाठी जास्त खर्च करू नका हा खर्च वाया जाणारा असतो असे गुरूजी आपल्या प्रत्येक सभेत तसेच व्यक्तिगतरित्या सांगत.अत्यल्प खर्चात गांधी लग्न हे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या १४ कलमी योजनेमधील एक कलम होते.आधि केले मग सांगितले या उक्तिप्रमाणे गुरूजींनी आपल्या धाकट्या भावाचे,किसन चे लग्न गांधी पध्दतीने लावून दिले.१९४५ मध्ये माळशिरस तालुका काँग्रेस कार्यकर्त्यांची सभा ना.काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली अकलुजमध्ये भरली होती.या जाहीर सभेत त्यांनी किसनचा विवाह चि.सौ.कां.वत्सला यांच्याबरोबर सुमारे ४००० जनसमुदयासमोर अत्यंत साधेपणाने लावला.वत्सला गुरूजींच्या पत्निंची सख्खी धाकटी बहिण होती.नवरदेव किसनराव यावेळी अकलुजच्या खरेदी विक्री संघाच्या धान्य दूकानात कामाला होते.त्यांना दूपारी १२ ते २ यावेळेत जेवणाची सुट्टी असायची.या सुट्टी दरम्यान लग्न करून २ वाजता ते कामावर हजरदेखील झाले.गुरूजींनी अशा प्रकारे साध्या पध्दतीच्या गांधी लग्नाचा आदर्श लोंकासमोर ठेवला. हुंडा देणे घेणे हे गुरूजींच्या तत्वातबसत नव्हते.त्यांनी त्याविरोधात प्रचार केला एवढेच नव्हे तर आपल्या चारही मुलांच्या विवाहात हूंडा घेतला नाही.

**शैक्षणिक कार्य :-** गुरूजींना शिक्षक होण्याची इच्छा होती पण ती पूर्ण झाली नाही पण गुरूजींनी शैक्षणिक क्षेत्रात कार्य करून आपली ही इच्छा पूर्ण केली.प्रौढ साक्षरता वर्ग सुरू करून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लोकांना शिकवले.सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी १९४७ मध्ये विजय विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली.या वसतिगृहाचे गुरूजी पहिले अधिक्षक होते.साडेचार वर्ष त्यांनी हे काम पाहिले.वसतिगृहासाठी धान्य व मदत गोळा करण्याचे त्यांनी काम केले.तसेच सहकार महर्षींनी शिक्षण प्रसारक मंडळ,अकलुज या शिक्षण संस्थेची स्थापना केली .गुरूजी या शिक्षण संस्थेचे १९४८ ते १९६९ या काळात सचिव होते. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसचें प्रचार कार्य करताना गुरूजी शिक्षणाचे महत्व लोकांना पटवुन सांगत.माळशिरस तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी म्हणूनही गुरूजींनी काम पाहिले.या मंडळामार्फत माळशिरस तालुक्यात ४१ व्हालंटरी शाळा सुरू होत्या.प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी सरकारने घेतल्यानंतर या सर्व व्हालंटरी शाळा दि.११ ऑगष्ट १९५५ रोजी लोकल बोर्डाच्या ताब्यात गेल्या. १९४८ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचा भव्य सत्कार समारंभ सातारा येथे संत गाडगे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.या समारंभाला गुरुजी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या सांगण्यावरून उपस्थित होते.समारंभानंतर कर्मवीर अण्णांच्या सांगण्यावरून गुरूजींनी चार-पाच दिवस रयत शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात मुक्काम केला.तेथील दैनंदिन कामकाजाचे निरीक्षण केले.त्यानंतर कर्मवीर अण्णांच्या मोटारीतुन त्यांच्याबरोबर गुरूजी लोणंद,वाल्हा,पुणे इ.ठिकाणी गेले.यावेळी पुण्याचे महापौर बाबुराव सणस आणि इतर मान्यवरांना भेटण्याची संधी गुरूजींना मिळाली.शनिवार दि.१७ जुलै १९५४ रोजी संत गाडगे महाराज कॉलेजचे उद्घाटन धनंजयराव गाडगीळ यांच्या हस्ते झाले त्यावेळीही गुरूजींना कर्मवीर अण्णांच्या मोटारीतुन त्यांच्याबरोबर जाण्याची व कॉलेजच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित रहाण्याची संधी मिळाली.

**धार्मिक यात्रा :-** ज्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपण लढलो तो देश आपण पहावा असे गुरूजींना वाटणे साहजिकच होते. धार्मिक यात्रेच्या निमित्ताने गुरूजींनी संपूर्ण भारतभर प्रवास केला.१९४८ मध्ये त्यांनी आपली पहिली काशी यात्रा केली.विशेष म्हणजे यावेळी ते काशीला क्रांतिसिंह नाना पाटील व नाथाजी लाड यांच्या बरोबर गेले होते.तनपूरे महाराज यांच्या चारधाम यात्रेच्या सांगता समारंभासाठी तनपूरे महाराजांच्या निमंत्रणावरून क्रांतिसिंह नाना पाटील व नाथाजी लाड काशीला जाणार होते.त्यांच्या समवेत गुरूजी काशीला गेले व तनपूरे महाराजांसमवेत काशीला राहिले.तनपूरे महाराजांच्या दिंडीबरोबर गुरूजींनी सुमारे एक महिना पायी उत्तरभारताचा प्रवास केला.यावेळी अलाहाबादच्या कुंभमेळ्यामध्ये सहभागी होण्याची संधी गुरूजींना मिळाली.रजा संपत आल्याने गुरूजींना तेथून निघावे लागले.त्रिंबकेश्वर पासून पायी प्रवास करीत,मुक्काम पडेल तेथे कीर्तन करीत,गुरूजी सुमारे एका महिन्याने घरी परतले.गुरूजींजवळ यावेळी फक्त २० रू. होते पण जवळचा एकही रूपया खर्च न करता,कोणाकडून एकही पैसा न घेता सुमारे ३ महिने गुरूजींनी संपूर्ण उत्तर भारताची यात्रा केली.पुढे गुरूजींनी अनेक वेळा तीर्थयात्रा केल्या.त्यामध्ये चारधाम पैकी रामेश्वर ,जगन्नाथपुरीची यात्रा १३ वेळा,द्वारका ९ वेळा तर बद्रीनारायण यात्रा ६ वेळा,सप्तपूऱ्यापैकी अयोध्याची यात्रा ३ वेळा,मथुराची यात्रा १२ वेळा,हरीद्वार १६ वेळा,काशी २२ वेळा,शिवकांची २ वेळा,उज्जैन ४ वेळा व ९ वेळा केलेल्या द्वारकेच्या यात्रेचा समावेश आहे.बारा जोतिर्लिंगाची गुरूजींनी केलेल्या यात्रेचा तपशिल पुढीलप्रमाणे:-(१) सोरटी सोमनाथ यात्रा ८ वेळा (२) श्री शैल्य मल्लिकार्जून यात्रा ४ वेळा.(३) महाबळेश्वर यात्रा ४ वेळा (४) ओंकारेश्वर यात्रा ४ वेळा (५) परळी वैजनाथ यात्रा ४ वेळा (६) भीमाशंकर यात्रा २ वेळा (७) रामेश्वर यात्रा ११ वेळा (८) औंढा नागनाथ यात्रा २ वेळा (९) काशी विश्वनाथ यात्रा २२ वेळा (१०) त्रिंबकेश्वर यात्रा ७ वेळा (११) केदारनाथ यात्रा ५ वेळा (१२) घृष्णेश्वर यात्रा २ वेळा.

**विविध धर्मादाय संस्थांना अन्नदान व धार्मिक कार्यासाठी दिलेल्या देणग्या :-** माने गुरूजींनी विविध धर्मादाय संस्थांना अन्नदान व धार्मिक कार्यासाठी **९३,०००** रूपयांच्या देणग्या दिल्या.याशिवाय आपल्या चार मुलांच्या नांवे प्रत्येकी १ लाख रू. व मुलगी क्रींतीदेवी यांच्या नांवे २०,००० रूपयांची कायम ठेव बँकेत ठेवली.त्यावर मिळणारे व्याज हे धर्मादाय कारणासाठीच खर्च करावे असे बंधन घालण्यात आले.

**शाळा-महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यासाठी प्रोत्साहनपर पारितोषिक-बक्षिस योजना :-** माने गुरूजींनी विविध शाळा-महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यासाठी प्रोत्साहनपर पारितोषिके व बक्षिसे ठेवली आहेत.त्यासाठी बँकेत ७५,००० रूपयांची कायम ठेव ठेवून येणाऱ्या व्याजातुन दरवर्षी ही बक्षिसे दिली जातात. त्यांच्या पश्चातही पुढे हा उपक्रम चालु रहाणार आहे.

**थोरा-मोठ्यांचा सहवास व मार्गदर्शन :-** गुरूजींना अनेक इतिहासप्रसिध्द व्यक्तिंच्या सानिध्यात रहाण्याची,त्यांना जवळून पहाण्याची तसेच त्यांच्या मार्गदर्शनाची संधी मिळाली.त्यामध्ये अकलुजचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील,कर्मवीर बाबासाहेब पाटील.धर्मवीर सदाशिवराव माने पाटील,माळशिरस तालुक्याचे माजी आमदार मारूतराव कुदळे,माळशिरस तालुक्याचे माजी आमदार चांगोजीराव देशमुख,मोहोळचे संभाजीराव गरड,करमाळा तालुक्याचे माजी आमदार नामदेवराव जगताप,पंढरपूरचे आमदार बाबूराव जोशी,मामासाहेब जगदाळे,खासदार तुळशिदास जाधव,माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले.माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक,माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख,माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील,माजी राज्यपाल एस.एम.कृष्णा,यांचा समावेश आहेच पण यांच्याशिवाय महात्मा गांधीजी,पंडीत जवाहरलाल नेहरू,मौलाना अबुल कलाम आझाद, सरदार वल्लभभाई पटेल,खान अब्दूल गफारखान,आचार्य विनोबा भावे,श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी, श्रीमती सोनिया गांधी, यशवंराव चव्हाण,पुरूषोत्तमदास टंडन,क्रांतिसिंह नाना पाटील,कर्मवीर भाऊराव पाटील,काकासाहेब गाडगीळ,केशवराव जेधे,भाऊसाहेब हिरे,शंकरराव देव,शंकरराव मोरे,मामासाहेब देवगिरीकर, एस.एम.जोशी,साने गुरूजी,संत तुकडोजी महाराज,संत गाडगे बाबा,निरंकारी बाबा हरदेव सिंग,आचार्य रजनिश,सत्य श्री साईबाबा,तनपूरे महाराज,कैकाडीमहाराज,आसाराम बापू इत्यादिंच्याही सानिध्यात रहाण्याची,त्यांच्या मार्गदर्शनाची,किंवा त्यांना जवळून पहाण्याची संधी गुरुजींना मिळाली.

**गुरुजींना मिळालेले मानसन्मान,पुरस्कार,सवलती इत्यादि. :-** गुरुजींना अनेक मानसन्मान,पुरस्कारमिळाले.त्यापैकी काही महत्वाचे-(१)भारत सरकारतर्फे ताम्रपत्र (मंगळवार दि.१५ ऑगष्ट १९७२),१५ ऑगष्ट १९७२ पासुन दरमहा मानधन (भारत सरकार पत्र क्र.२१-८६६५/७३/एफ.एफ.-आय.एन.ए.दि.१८/१०/१९७२.)व दोन व्यक्तिसाठी पहील्या वर्गाचा मोफत रेल्वे पास (२) महाराष्ट्र सरकारतर्फे सन्मान पत्र (सोमवार दि.१५ एप्रील १९६८),दरमहा मानधन व दोन व्यक्तिसाठी मोफत एस.टी. पास (३) क्रांतिसिंह नाना पाटील,सातारा प्रतिसरकार हिरक महोत्सव समितीतर्फे सन्मान पत्र व मानचिन्ह (४) भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त केंद्र सरकार,महाराष्ट्र सरकार,अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या वतीने पुणे,मुंबई,दिल्ली येथे सत्कार,सन्मान पत्र व मानचिन्ह (५) सोलापूर जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाच्या समन्वय समितीच्या वतीने ज्येष्ठोत्तम जीवन गौरव पुरस्कार (सन २००७-०८) इत्यादि.

**इतर कार्य :-** (१) १९८५ पूर्वी सिमेंट तागाच्या विरळ गोण्यात भरले जात असे.त्यातुन प्रतिगोणी ४-५ किलो सिमेंट वाहतुक,हाताळणीमध्ये वाया जात असे.सिमेंटचे दरवर्षीचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान टळावे,यासाठी सिमेंट पॉलिथीनच्या गोण्यामध्ये भरले जावे म्हणून गुरूजींनी राष्ट्रपती,पंतप्रधान,मुख्यमंत्री,आमदार,खासदार,जिल्हा परिषदेचे अध्यक्ष,सिमेंट कार्पोरेशन,सिमेंट उत्पादक इत्यादिंना मराठी,हिंदी,इंग्रजी भाषेत सुमारे १००० छापील प्रतित निवेदने पाठवली गुरूवार दि.१५ मार्च १९८४ रोजी गुरूजींनी मुंबई येथील महाराष्ट्र विधानसभेसमोर व बुधवार दि. १५ ऑगष्ट १९८४ पासून सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १४ दिवस धरणे धरले.या संदर्भात दैनिक संचारने सोमवार दि.२० ऑगष्ट १९८४ रोजी अग्रलेख लिहला.गुरूजींच्या प्रयत्नांना शेवटी यश आले .१९८५ पासून सिमेंट भरण्यासाठी चांगल्या,जाड गोण्यांचा वापर सुरू झाला.आणि कोट्यावधी रूपयांचे दरवर्षी होणारे नुकसान थांबले.

(२) मुंबई बस (बेस्ट) मध्ये स्वातंत्र्य सैनिकांना मोफत प्रवासाची सवलत मिळावी म्हणून गुरूजींनी बुधवार दि.१ ऑगष्ट १९९० रोजी मुंबईचे तत्कालिन महापौर छगन भुजबळ यांना निवेदन पाठवले.गुरूजींची ही मागणी मान्य झाली.

**समारोप :-** ज्यांच्या पासून स्फूर्ती व पेरणा घ्यावी असे माने गुरूजींचे जीवन चरित्र आहे.त्यांच्यावर दोन वेगवेगळ्या विचारधारेचा प्रभाव दिसतो.म.गांधीजींच्या सत्य आणि अहिंसेचा जसा त्यांच्यावर प्रभाव होता तसाच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या क्रांतिकारी विचारसरणीचाही प्रभाव होता.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेला आनंद व भावना व्यक्त करता येत नव्हत्या.भारतमाता स्वतंत्र झाल्याने डोळ्यातुन आनंदाश्रू वाहिले.पहिल्या स्वातंत्र्यदिनाचे ध्वजारोहण अकलुज चावडीवर माझ्या हस्ते झाले तो सर्वोच्च आनंदाचा क्षण होता असे दि.१५ ऑगष्ट २०१२ च्या लोकमतला दिलेल्या मुलाखतीत गुरूजी सांगतात.गुरूजींकडे पाहिल्यानंतर एखाद्या साधुला,ऋषी ला पहात असल्याचा,तर गुरूजींशी बोलताना एखाद्या विचारवंताबरोबर आपण बोलत आहोत असे वाटते.असे गुरुजींचे ऋषीतुल्य व्यक्तिमत्व आहे.अकलुजच्या सदाशिवराव माने विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक चिंतामण सीताराम घाटे यांनी १९६३ मध्येच त्यांचा उल्लेख अकलुजच्या आधुनिक तीर्थक्षेत्रातील महान राष्ट्रीय संत असा केला होता.आजही माने गुरूजींना हे विशेषण लागु पडते.विविध क्षेत्रामध्ये गुरूजींनी उत्तुंग कार्य केले तरीही त्यांना कोणताही गर्व किंवा अहंकार नाही.त्यांच्या या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नींची,मथूराबाईंची मोलाची साथ लाभली.आयूष्यात केलेल्या कार्याचे समाधान ते व्यक्त करतात.आजही वयाच्या ९७ व्या वर्षी त्यांचा उत्साह कायम आहे.कोणत्याही सार्वजनिक,शैक्षणिक, कार्यामध्ये मोंठ्या उत्साहाने ते सहभागी होतात.पहाटे ४ ला त्यांचा दिवस सुरू होतो.आणि रात्री १० वा.संपतो.अशा या महान व्यक्तिमत्वाला सलाम.त्यांना आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**निष्कर्ष :-** आदरणीय माने गुरूजी हे ऋषीतुल्य पण असामान्य धाडसी व्यक्तिमत्व आहे.देशभक्ती त्यांच्या नसानसात भरलेली आहे.सत्याग्रह केल्याबध्दल पोलिसांनी अटक करून कोठडीत ठेवले तेव्हाच मला शांत झोप लागली असे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात नमुद केले आहे.माफी मागुन शिक्षेपासून ते बचाव करू शकले असते पण त्यांनी तसे केले नाही. ४२ च्या क्रांतीचा तो काळ होता.याच दरम्यान त्यांची पत्नी प्रसूत होवून त्यांना पहिली मुलगी झाली.गुरूजींनी तिचे नांव क्रांती ठेवले.आणि कोणत्याही परिणामाची,घरादाराची,संसाराची पर्वा न करता सत्याग्रहासाठी त्यांनी घर सोडले.त्याग आणि देशभक्तिचें हे उत्तम उदाहरण आहे.त्यांच्या पश्चात सरकारने त्यांच्या घरातील साहित्याचा लिलाव केला.पण त्यांच्या पत्नीने आता आपलं कसं आणि काय होणार याचा यत्‌किंचीतही विचार केला नाही एवढेच नव्हे तर त्यांनी ही गोष्ट आपल्या पतीला कळूही दिली नाही.पतीच्या प्रत्येक कार्यात त्या पतीच्या पाठीशी असे म्हणण्यापेक्षा पतीबरोबर खंबीर उभ्या राहिल्या असे म्हटले तरी ते चूकीचे ठरणार नाही.अहिंसा आणि क्रांतिकारी अशा दोन्ही विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता.पण सत्य आणि अहिंसेचा मार्ग त्यांनी कधिही सोडला नाही. चहा न पिण्याचा,कर्ज आणि उधार माल न घेण्याचा, सचोटी आणि प्रामाणिक कार्य करण्याचा,केस न कापण्याचा,भगवे कपडे स्वतः हाताने शिवून परिधान करण्याचा जो निश्चय त्यांनी ७०-७५ वर्षापूर्वी केला आजही ते त्या निश्चयाशी ठाम आहेत.अशा एका असामान्य व्यक्तिच्या सानिध्यात,संपर्कात आपण आलो याचा सार्थ अभिमान वाटतो.


स्वातंत्र्य सैनिक श्री.रघुनाथ रामचंद्र माने गुरूजी.

**संदर्भ :-** (१) स्वातंत्र्य सैनिक श्री.रघुनाथ माने गुरूजी यांचे अप्रकाशित आत्मचरित्र.
(२) स्वातंत्र्य सैनिक श्री.रघुनाथ माने गुरूजी यांची मुलाखत दि.५ जानेवारी २०१४.
(३) मा.प्रथम वर्ग निवासी न्यायाधिश, पंढरपूर यांचे निकालपत्र,दि.७ सप्टे १९४२,क्रिमीनल केस क्र.४३/१९४२.
(४) महाराष्ट्र शासनाकडून मिळालेले सन्मानपत्र,दि.१५ एप्रील १९६८.
(५) भारत सरकारकडून मिळालेले ताम्रपत्र,दि.१५ ऑगष्ट १९७२.
(६) मा.विसापूर जिल्हा कारागृह अधिक्षक यांचे प्रमाणपत्र,दि.९ एप्रील १९६६
(७) सोलापूर जिल्ह्यातील केंद्र स्वातंत्र्य सैनिकांची माहिती दर्शवणारे विवरणपत्र.
(८) ज्योती,(१९६२-६३) सदाशिवराव माने विद्यालय,अकलुज चे नियतकालिक,वर्ष पहिले,अंक पहिला.
(९) दैनिक संचार,सोलापूर,सोमवार दि.२० ऑगष्ट १९८४.
(१०) दैनिक लोकमत सोलापूर,बुधवार दि.१५ ऑगष्ट २०१२.
(११) स्वातंत्र्य सैनिक श्री.रघुनाथ माने गुरूजी यांचा जीवन शिक्षण मंदिर नातेपुते येथील शाळा सोडल्याचा दाखला ,
(१२) येवले शंकरराव,सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा,प्रकाशक-ऑगष्ट क्रांती सुवर्णमहोत्सव समिती,मुंबई.
(१३) साळूंखे एम.बी. संपादक प्रकाशक,(१९८३),स्वातंत्र्य सैनिकांच्या आठवणी,खंड पहिला,सहकार डायरी,पुणे.
(१४) कोसंदर प.रे.,(१९५२),सोलापूर शहर व जिल्हा कार्यकर्त्यांचा परिचय ग्रंथ,सचित्र साप्ताहिक प्रकाशन,सोलापूर.
(१५) देशमुख सा.सु.(२००८),स्वातंत्र्य सैनिक श्री.रघुनाथ माने गुरूजी,अल्पपरिचय.
(१६) शहासने चंद्रकांत,(२०१२),देशभक्त शब्दकोश,बहुजन साहित्यधारा,पुणे.